महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६ '१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र. : तंशिविकापु/विवि-५/**जा.म.दि.**/२०२३/1110 दिनांक : 06 MAR 2023

**परिपत्रक**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या
शासकीय/ अशासकीय अनुदानित/खाजगी विनाअनुदानित,
सर्व पदवी, पदविका व पदव्युत्तर व्यावसायिक/तांत्रिक अभ्याक्रमाच्या
संस्था पुणे.

**विषय : दि. ०८ मार्च, २०२३ रोजी जागतिक महिला दिन साजरा करणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, दरवर्षी दिनांक ०८ मार्च, २०२३ हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन हा महिलांच्या सांस्कृतिक, राजकीय आणि सामाजिक व आर्थिक कामगिरीच्या सन्मानार्थ साजरा करण्यात येतो. त्यानुसार खालील कार्यक्रमांचे संस्था/कार्यालय स्तरावर आयोजन करण्यात यावे.

१. संस्थेमध्ये मुलींच्या स्वरंरक्षणासाठी मार्गदर्शनपर प्रशिक्षणाचे आयोजन करणे.
२. महिला दिनाचे औचित्य साधून महिला सुरक्षाविषयक जाणीव जागृती निर्माण करणे व महिला सुरक्षा अभियान राबविणे.
३. महिला दिनाचे औचित्य साधून वृक्ष संवर्धन मोहिम राबविणे.
४. माझी वसुंधरा कार्यक्रमाचे आयोजन करणे.
५. कर्तृत्वसंपन्न व राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्याती असलेल्या महिलांचे व तज्ञ व्याख्यात्यांचे व्याख्यान व परिसंवादाचे आयोजन करणे.
६. महिला सुरक्षा/महिला सबलीकरण हा विषय केंद्रभूत मानून वकृत्व, निबंध, रांगोळी, चित्रकला, भिंतीपत्र, पोष्टर, घोषवाक्य इ. उपक्रमाचे आयोजन करणे.

तरी आपल्या संस्थेमध्ये दिनांक ०८ मार्च, २०२३ रोजी, उपरोल्लेखित कार्यक्रमांचे आयोजन करुन आंतरारष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आवश्यक कागदपत्र/फोटोसह या ई-मेलवर info.dteropune@gmail.com विभागीय कार्यालयास सोमवार दिनांक १३.०३.२०२३ रोजीपर्यंत सादर करण्यात यावा.

**(डॉ.द.व्यं.जाधव)**
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेत स्थळावर प्रदर्शीत करणेसाठी.